स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक गट-क या संवर्गातील कर्मचा-यांना लाभांच्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचे लाभ मंजुर करणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सार्वजनिक बांधकाम उत्तर विभाग
आदेश क्र.बांध./कार्या-१/आस्था-२/५४०/२०२६
अहिल्यानगर दिनांक -स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

वाचा-
१. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-१०९५/प्र.क्र.१/९५, दिनांक ०८/०६/१९९५.
२. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. वेतन-११९९/प्र.क्र.२/९९/सेवा-३, दिनांक २०/०७/२००१.
३. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. वेतन-२०००/प्र.क्र.१०/सेवा-३, दिनांक ०३/०८/२००१.
४. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. वेतन-११०९/प्र.क्र.४४/सेवा-३, दिनांक ०१/०४/२०१०.
५. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. वेतन-१११९/प्र.क्र.३/२०१९/सेवा-३, दिनांक ०२/०३/२०१९.
६. मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे रिट याचिका क्र. ८००९/२०२१ मधील निर्णय, दिनांक ०२/०८/२०२२.
७. मा. अवर सचिव, ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. न्यायप्र-२०२१/प्र.क्र.१३१/ आस्था-४, दिनांक ११/१०/२०२३.
८. गठित समितीच्या बैठकीचे मंजूर इतिवृत्त, दिनांक -१०/०७/२०२६

उपरोक्त संदर्भ क्र. १ चे शासन निर्णयान्वये सातव्या वेतन आयोगामध्ये तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना ही वेतन मेंट्रीक्समधील वेतनस्तर एस-२० पर्यत वेतन घेणा-या (सहाव्या वेतन आयोगातील पे बँड रु.१५६००-३९१०० ग्रेड पे रु.५४०० या वेतन संरचनेशी समकक्ष) कर्मचा-यांना लागू केली आहे. सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या अटी व शर्ती याबाबत व सेवांतर्गत आश्वासती प्रगती योजनेच्या गठीत समितीने मान्य केलेल्या प्रस्तावाचा विचार करुन उपरोक्त शासन निर्णयात नमुद केलेल्या अटी व शर्तीनुसार स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक गट-क मधील खालील कर्मचा-यांना तीन लाभांच्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत १०,२०, व ३० वर्षाच्या नियमित सेवेनंतर पदोन्नती साखळीतील पदाचा खालीलप्रमाणे नमुद केलेनुसार त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे कनिष्ठ अभियंता पदाचा वेतनस्तर एस १५-४१८००-१३२३०० खालील अटी व शर्तींना अधीन राहून मंजुर करण्यात येत आहे.

| अ क्र | तालुका | कर्मचारी नांव | प्रथम नियुक्तीने हजर दिनांक | | | १२/ १० वर्ष पूर्ण दिनांक | व्यवसाय परिक्षा उत्तीर्ण दिनांक | १० वर्षाच्या सेवेनंतर पहिला लाभ अनुज्ञेय दिनांक | | | अश्वासित प्रगती योजनेचा लाभ मंजूर केलेल्या पदाचे नांव व वेतश्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | | | | | ५ | | | ६ |
| १ | जि.प.सा.बा. उप विभाग पाथर्डी | श्री. अर्जुन शंकर पठाडे | ३१ | १२ | २००९ | ०१/०१/ २०२० | १६-०६- २०१३ | १ | १ | २०२० | क.अभियंता पदाची वेतनश्रेणी एस १५-४१८००-१३२३०० साठी पहिलास लाभ |
| २ | जि.प.सा.बा. उप विभाग- पारनेर | श्री. राहुल जगन्नाथ सोनवणे | १२ | ६ | २००० | १३/६/ २०१० | ०२/०२/ २०२५ सुट | ०२ | ०२ | २०२५ | क.अभियंता पदाची वेतनश्रेणी एस १५-४१८००-१३२३०० साठी पहिलास लाभ |
| ३ | जि.प.सा.बा. उप विभाग- राहाता | श्री. दिपक धर्मनाथ अकोलकर | ३१ | १२ | २००३ | ०१/०१/ २०१४ | १७/०२/ २०२६ | १७ | ०२ | २०२६ | क.अभियंता पदाची वेतनश्रेणी एस १५-४१८००-१३२३००साठी पहिलास लाभ |



File No. ZPAHM-14012(11)/52/2026-W NORTH (Computer No. 3528356)
Generated from eOffice by Shul Sunil Ashok, SAS ( SA), SENIOR ASSISTANT, ZILLA PARISHAD AHILYANAGAR on 08/09/2026 01:00 PM

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | जि.प.सा.बा. उप विभाग-शेवगाव | श्री सतिश भास्कर मोरे | २५ | २ | २०१६ | २६/०२/ २०२६ | १७/०२/ २०२६ | २५ | २ | २०२६ | क.अभियंता पदाची वेतनश्रेणी एस १५-४१८००-१३२३००साठी पहिलास लाभ |
| ५ | जि.प.सा.बा. उप विभाग-नेवासा | श्री संपत शेषराव सोनवणे | २३ | २ | २०१६ | २३/०२/ २०२६ | १७/०२/ २०२६ | २३ | २ | २०२६ | क.अभियंता पदाची वेतनश्रेणी एस १५-४१८००-१३२३०० साठी पहिलास लाभ |
| ६ | जि.प.मुख्या लय (उत्तर) | श्री.वनिता सुभाष दहिफळे | २ | १२ | २०१४ | ०२/०२/ २०२४ | १७/०२/ २०२६ | १७ | ०२ | २०२६ | क.अभियंता पदाची वेतनश्रेणी एस १५-४१८००-१३२३००साठी पहिलास लाभ |

| अ क्र | पदाचे नांव | ६ व्या वेतन आयोगातील वेतन बॅन्ड | ७ व्या वेतन आयोगातील वेतन मॅट्रीक्स मधील वेतनस्तर |
|---|---|---|---|
| १ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | ५२००-२०२०० ग्रेडपे २४०० | एस-८ २५५००-८११०० |
| २ | कनिष्ठ अभियंता | ९३००-३४८०० ग्रेडपे ४३०० | एस १५-४१८००-१३२३०० |

<u>अटी व शर्ती</u>

१) संबंधीत कार्यालय प्रमुख यांनी कर्मचा-यांचे सलग सेवेचे दाखले, अर्हता परीक्षा, संगणक परीक्षा, स्थायित्व प्रमाणपत्रे, जातवैधता प्रमाणत्रे, मत्ता व दायित्वे विवरणपत्र, चौकशी बाबतची व इतर सादर केलेले दस्तऐवजांनुसार संबंधीत कर्मचा-यांना लाभ अनुज्ञेय करण्यात आलेला आहे. या बाबतची खात्री संबंधीत खाते प्रमुखांनी करुन सुधारीत वेतननिश्चिती करावी.

२) सातव्या वेतन आयोगामधील वेतन मॅट्रीक्समधील वेतनस्तर एस-२० पर्यत वेतन घेणा-या कर्मचा-यांनाच तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू राहील. म्हणजेच संबंधीत कर्मचारी वेतन स्तर -२१ मध्ये वेतन आहरीत करु लागतील तेव्हा त्यांना या योजनेअंतर्गत लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

३) या योजनेखाली पात्र कर्मचा-यांना संपुर्ण सेवा कालावधीत पात्रतेनुसार तीन वेळा लाभ मंजूर करण्यात येईल.

४) सदर योजनेचा लाभ हा कर्मचा-यांना संपुर्ण सेवा कालावधीत (म्हणजेच ३० वर्ष नियमित व सलग सेवा केलेल्या) दोन कार्यात्मक पदोन्नत्या मिळाल्या आहेत. त्यांना एक लाभ अनुज्ञेय राहील. ३० वर्षाच्या नियमित व सलग सेवेत कार्यात्मक पदोन्नती व लाभाची संख्या तीन पेक्षा जास्त नसावी याची खात्री संबंधीत कार्यालय प्रमुखांनी करावी.

५) संपूर्ण सेवा कालावधीत तीन कार्यात्मक पदोन्नती झालेल्या कर्मचा-यांना या योजनेचा एकही लाभ अनुज्ञेय असणार नाही.

६) सदर योजनेअंतर्गत पदोन्नती साखळीतील पदोन्नतीच्या पदाचा वेतनस्तर मंजूर करण्यात येत असल्यामुळे त्यासाठी पदोन्नतीच्या पदाचे सर्व निकष पुर्ण करणे आवश्यक राहील.

७) यापूर्वी ज्या कर्मचा-यांना कालबध्द पदोन्नती अथवा सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत यथास्थिती पहिला व दुसरा लाभ मंजूर करण्यात आले आहे. त्यांचे ते लाभ हे या योजनेअंतर्गत प्रकरणपरत्वे पहिला व दुसरा लाभ समजण्यात येईल.

८) विवक्षित सेवा कालावधीनंतर संबंधीतपदाच्या कर्तव्ये व जबाबदारीत वाढ न होता, अकार्यात्मक व तत्सम उच्च वेतन संरचनेचा मंजूर करण्यात आलेला/येणारा लाभ हा या योजनेखालील पहिला लाभ समजण्यात येईल.

९) ज्या कर्मचा-यांना पलिा लाभ म्हणून ज्या पदाची वेतन संरचना मंजुर करण्यात आली आहे. त्या पदाला विवक्षीत सेवा कालावधी म्हणतात त्या पदाच्या कर्तव्य व जबाबदारीमध्ये वाढ न देता अकार्यात्मक व तत्सम उच्च वेतन संरचना मंजुर करण्यात येत असेल तर ती अकार्यात्मक वा तत्सम उच्च वेतन संरचना हा दुसरा लाभ म्हणून मंजुर करण्यात येईल.

१०) ज्या कर्मचा-यांना दिनांक ०१/०१/२०१६ ते ०२/०३/२०१९ या कालावधीपर्यत यस्थास्थिती १२ किंवा २४ वर्षाच्या पदोन्नतीच्या साखळीतील पदावर पहिला अथवा दुसरा लाभ मंजुर करण्यात आला आहे त्यांची या पूर्वीचे १२/२४ वर्षाच्या लाभाचे यापूर्वीचे आदेश रद्द करण्यात येत असुन तीन लाभाच्या योजने अंतर्गत पहिला/दुसरा / तिसरा लाभ सुधारीत करुन मंजुर करण्यात येत आहे. त्यानुसार असुधारीत लाभाची रक्कम सुधारीत लाभाच्या रक्कमेशी समायोजित करण्यात येवून फरकाची रक्कम देय असल्यास अनुज्ञेय करावी.

११) ज्या कर्मचा-यांच्या नियमित व सलग सेवेची १० वर्ष दिनांक ३१/१२/२०१५ पूर्वी किंवा दिनांक ३१/१२/२०१५ रोजी पूर्ण होतील त्यांना या योजनेअंतर्गत तीन लाभाच्या योजनेचा पहिला लाभ हा दिनांक ०१/०१/२०१६ रोजी पात्रतेनुसार मंजुर केला जाईल.

१२) ज्या कर्मचा-यांची २० वर्षाची सेवा दिनांक ०१/०१/२०१६ रोजी वा नंतरच्या तारखेस पूर्ण होईल त्यांना तिसरा लाभ हा दुस-या लाभापासुन १० वर्षानंतर पदोन्नतीच्या साखळीतील पदावर पात्रतेनुसार अनुज्ञेय होईल.

१३) दिनांक ०१/०१/२०१६ व नंतरच्या पदोन्नतीच्या वेळी म.ना.सेवा.(सुधारीत वेतन) नियम २०१९ या अधिसुचनेतील नियम क्र.१३ नुसार वेतन निश्चतीचा लाभ अनुज्ञेय केला जाणार असल्याने त्याच तरतुदीनुसार पदोन्नतीच्या साखळीतील पदावरील पदधारकास नवीन योजनेत वेतन निश्चितीचा लाभ अनुज्ञेय राहील.

१४) दिनांक ०१/०१/२०१९ पूर्वी वेतन पदोन्नतीच्या साखळीतील पदावर कार्यरत कर्मचा-यांना दिनांक ०१/०१/२०१९ रोजी व तीन लाभाच्या योजनेतील यस्थास्थिती पहिला/दुसरा/तिसरा लाभ पात्रतेनुसार सहाव्या वेतन आयोगाच्या वेतन मॅट्रीक्स मध्ये पदोन्नतीच्या पदाच्या वेतनश्रेणीत अनुज्ञेय राहील.

१५) तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना दिनांक ०१/०१/२०१६ पासुन लागु करण्यात आली असल्याने जे कर्मचारी यापूर्वीच्या योजनेनुसार यस्थास्थिती पहिला व दुसरा लाभ घेवून दिनांक ०१/०१/२०१६ पूर्वीच शासन सेवेतून सेवानिवृत्त/ मयत झाले आहेत. त्यांना यस्थास्थिती १२ अ अट व २४ अ ६ या प्रमाणे सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगतीयोजनेचा लाभ अनुज्ञेय ठरणारनाही तथापी जे कर्मचारी कालबध्द पदोन्नती / सेवांअतर्गत आश्वासीत प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय ठरणार नाही. तथापी जे कर्मचारी कालबध्द पदोन्नतीस /सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना/ सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत पगती योजना यांचा यस्थास्थिती पहिला/दुसरा लाभ हा दिनांक ३१/१२/२०१५ पूर्वी प्राप्त होऊन दिनांक ०१/०१/२०१६ रोजी किंवा नंतरच्या तारखेस सेवानिवृत्त/ मयत झाले आहेत. त्यांना त्यांच्या लाभाच्या तारखेपासुन यस्थास्थिती ८ वर्षाची सेवा तसेच ६ वर्षाची सेवा हि त्यांच्या निवृत्तीच्या तारखेस / मृत्यूच्या तारखेस पूर्ण होत आहे. अशा कर्मचा-यांना अनुज्ञेयते नुसार व पात्रतेनुसार दुसरा/तिसरा लाभ अनुज्ञेय राहील.

१६) तीन लाभाच्या योजनेअंतर्गत संबंधीत कर्मचा-यास पहिला/दुसरा/तिसरा लाभाच्या अनुज्ञेयतेसाठी गोपनिय अहवाल प्रतवारीच्या सरासरीचा निकष हा निकटच्या पदोन्नतीच्या पदासाठी सामान्य प्रशासन विभागाकडील सुधारीत शासन निर्णय दिनांक ०१/०८/२०१९ मधील विहीत केल्यानुसार राहील.

१७) कार्यात्मक पदोन्नती नाकारल्यास अशा अथवा कार्यात्मक पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचा-यास भविष्यात होणा-या / झालेल्या विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकित कार्यात्मक पदोन्नती पात्र ठरल्यास त्यास कार्यात्मक पदोन्नतीचा कार्यभार स्विकारल्या पासुन १० वर्षाच्या नियमित सेवेनंतर विहीत अटी व शर्तीच्या पुरततेनुसार या योजनेअंतर्गत पहिला/दुसरा/तिसरा लाभ मंजुर करण्यात येईल.

१८) सदर योजनेअंतर्गत पहीला/दुसरा/तीसरा मंजूर करताना संबंधीत मागास कर्मचा-यास जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.

१९) या योजने अंतर्गत पहिला/दुसरा/तिसरा अथवा तीनही लाभ मंजूर केल्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नती नाकारलेल्या अथवा पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचा-यांना देण्यात आलेले लाभ काढून घेण्यात येतील. तथापी अशा लाभांची वसुली करण्यात येणार नाही.तसेच असे लाभ काढून घेतल्यानंतर संबंधीताची वेतननिश्चिती हि त्यांना जणू काही या योजनेचे लाभ देण्यात आले नव्हते असे समजून म.ना.सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम ११ च्या तरतुदीनुसार करण्यात यावी.

२०) रोजंदारीवरील, कार्यव्यापी आस्थापनेवरील कंत्राटी तत्वावरील व तदर्थ नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचा-याना या योजनेचा लाभ अनुज्ञेय असणार नाही.

२१) संबंधीत कर्मचा-याची छोटया कुटुंबाच्या व्याख्यानुसार दोन अपत्य असलेची खात्री संबंधीत कार्यालय प्रमुखानी करुन दोन पेक्षा जास्त अपत्य असलेचे निदर्शनास आल्यास संबंधीताना अपात्र करण्यात येवून लाभासाठी अपात्र करण्यात येईल.

२२) संबंधीत कर्मचा-याकडून भविष्यात प्राप्त होणा-या प्रचलित शासन निर्णयानुसार व लेखा परिक्षणामध्ये वेतनश्रेणी बाबत अतिप्रदाना संबंधीत वसुली निघाल्यास सदर वसुली करण्याची जबाबदारी संबंधीत खाते प्रमुखाची राहील. तसेच अशा प्रकारची वसुली करुन देण्यास सहमती असले बाबत अशा अशयाचे बंधपत्र घेवून वेतननिश्चिती करण्यात यावी.

२३) संबंधीताकडून करारनामा करुन घेणे कामी नमुना जोडला आहे.

२४) श्री.राहुल जगन्नाथ सोनवणे-स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक यांचेकडे प्रलंबित असलेली वसुली बाबत मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे रिटपिटिशन ५०१८/२०२६ दाखल केलेले असून सदर वसुलीस स्थगीती देण्यात आलेली आहे. मा. न्यायनिर्णयानंतर न्यार्यनिणयाच्या अधिन राहून वसुलीबाबतची जबाबदारी संबधीत कार्यालय प्रमुख यांची राहील.

२५) श्री.दिपक धर्मनाथ अकोलकर-स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक यांचेकडे प्रलंबित असलेली वसुली बाबत मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे रिटपिटिशन ४९५१/२०२६ दाखल केलेले असून सदर वसुलीस स्थगीती देण्यात आलेली आहे. मा. न्यायनिर्णयानंतर न्यार्यनिणयाच्या अधिन राहून वसुलीबाबतची जबाबदारी संबधीत कार्यालय प्रमुख यांची राहील.

२६) सदर आदेशाची कर्मचा-याच्या मुळ सेवापुस्तकात नोंद घेण्यात यावी. व सदर आदेशाची सत्वर अंमलबजावणी करण्यात यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२६०९०७९३००३४ असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 07-09-2026 21:08:40

आनंद भंडारी (भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री---------------------------------स्थापत्य अभि.सहा. जि.प.सा.बा. उप विभाग, नेवासा/शेवगाव/पारनेर/राहाता/पाथर्डी, जिल्हा अहिल्यानगर

प्रत - १.कार्यकारी अभियंता जि.प.सा.बा उत्तर / दक्षिण / विभाग जि.प.अहिल्यानगर
२. उप अभियंता, जि.प.सा.बां./लपा उपविभाग ------------------------------------ (सर्व)
३. गट विकास अधिकारी, पंचायत समिती -----------------------------------------सर्व

प्रत - उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा) जि.प.अहिल्यानगर यांना माहितीसाठी.
प्रत- मुख्य लेखा व वित्त अधिकारी जि.प.अहिल्यानगर
प्रत- निवड नस्ती